अतिक्रमणे

शासकीय पड व गायरान जमिनीवर शेतीसाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्र. एलइएन-१०९२/प्र. क्र. ६५/ज-१
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ३ जुलै, १९९२.

वाचा :- १] शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एलईएन-१०९०/प्र. क्र. १७२/ज-१ दिनांक २८. ११. १९९१.

२] शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र. एलइएन-१०९२/प्र. क्र. ६५/ज-१, दिनांक २२. ४. १९९२.

परिपत्रक :

शासकीय पड व गायरान जमिनीवरील दिनांक १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० या कालावधीमध्ये मागासवर्गीय व इतर व्यक्तींची शेतीसाठी केलेली अतिक्रमणे वरील दिनांक २८. ११. १९९१ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या शर्ती व अटींवर दिनांक ३१ मार्च १९९२ पर्यन्त समयबध्द कार्यक्रम आखून नियमानुकूल करावी असे शासनाचे आदेश दिलेले आहेत. हे काम पूर्ण करण्यासंदर्भात जिल्हाधिका-यांना आलेल्या अडचणीसंदर्भात आवश्यक ती स्पष्टीकरणे वर निर्देशिलेल्या दिनांक २२. ४. ९२ च्या शासन परिपत्रकात देण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने आता शासन असे आदेश देत आहे की, अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी <u>दिनांक ३१ जुलै १९९२ पर्यन्त</u> मुदत वाढवून देण्यात येत आहे.

२. हे काम हाताळताना येत असलेल्या काही अडचणी खालील प्रमाणे आहेत :

१] ग्रामपंचायत ठराव उपलब्ध झाले नाहीत,

२] मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांच्याकडून "ना हरकत प्रमाणपत्र" उपलब्ध झालेली नाहीत,

३] सिंधुदुर्ग जिल्हयात काही जमिनी तालंबा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात आणि बुडीत क्षेत्रात येत असल्यामुळे कार्यवाही करता येत नाही.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
9 JUN 1992
शाखा-
जिल्हाधिकारी

कृ. मा. प.

३. या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते आदेश लवकरच काढण्यात येतील. त्यामुळे अशा कारणासाठी पडून असलेली प्रकरणे वगळून इतर सर्व प्रकरणात अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची कार्यवाही वरील वाढीव मुदतीत पूर्ण करण्याची दक्षता जिल्हाधिका-यांनी घ्यावी.

४. अलीकडेच या कामाचा आढावा घेतला असता असे आढळून आले की, या कामाबाबत समाधानकारक प्रगती झालेली नाही. मा. मंत्री [महसूल] यांनी असमाधान व्यक्त करून दिनांक ३१. ७. १९९२ पर्यन्त कार्यवाही पूर्ण होईल असे पहावे असे आदेश दिले आहेत. जिल्हाधिका-यांनी व्यक्तीशः लक्ष घालून दिनांक ३१ जुलै, १९९२ पूर्वी अतिक्रमणे नियमित करण्याचे काम पूर्ण होईल असे पहावे आणि दिनांक ७. ८. १९९२ पूर्वी दिनांक ३१ जुलै १९९२ पर्यन्त पूर्ण केलेल्या कामाचा अहवाल विहित प्रपत्रात सादर करावा. तसेच या अहवालासोबत प्रलंबित प्रकरणांची माहिती कारणांच्या विगतवारीसह सादर करावी. त्यात प्रलंबित प्रकरणांची संख्या, मागासवर्गीय व्यक्तींची संख्या व इतर वर्गीय व्यक्तींची संख्या, जमिनीचे क्षेत्र इत्यादि माहिती नमूद करावी. ही माहिती गायरान जमिनी आणि शासकीय पड जमिनी यांची स्वतंत्र सादर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ त्रि. शं. कर्वे ]
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,